**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर
ओंकार ३१, अंजली कॉलनी, गेंडामाळ, शाहूपुरी, जि.सातारा अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपआयुक्त (प्रशासन),
दुग्धव्यवसाय विकास विभाग, खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई

**जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त,
दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय,
खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०१ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.६.२००९ |

**३. उपस्थित**

**जन माहिती अधिकारी** तथा आयुक्त, दुग्धव्यवसाय विकास विभाग यांचे कार्यालय, खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई श्री.बी.एम.सावंत

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.१.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ८.२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १०.३.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १५.४.२००८ |
| ८ | **<u>मुळ अर्जात मागणी केलेली माहिती</u>** | |

माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.१६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री.शिवाजी जगन्नाथ वाडेकर यांनी मागितलेली माहिती दुग्धव्यवसाय विकास विभागाच्या प्रादेशिक कार्यालयाकडून तपशीलवार देण्यात आली आहे. विविध विभागांशी संबंधित, अशी माहिती श्री.वाडेकर यांनी मागितली असून त्या त्या विभागांकडून त्यांनी ती प्राप्त करून घ्यावी, असे त्यांना वेळीच कळविण्यात आले होते. तसेच पुणे, नवी मुंबई, वरळी, नाशिक, औरंगाबाद व नागपूर येथील महाव्यवस्थापकांना/दुग्धव्यवसाय विकास अधिकाऱ्यांनाही अपीलकर्त्यास माहिती देण्याबाबत कळविण्यात आले, असे लेखी व तोंडी निवेदन अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त (प्रशासन), दुग्धव्यवसाय विकास विभाग, खान अब्दुल गफारखान मार्ग, वरळी, मुंबई यांचे प्रतिनिधी श्री.बी.एम.सावंत यांनी पूरक कागदपत्रांसह केले. त्यांचे निवेदन मान्य करण्यात येत आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपिल निकाली काढण्यात येत आहे.




(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि२५.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. शेखर अरविंद कुलकर्णी
५०१, रास्ता पेठ, रास्तेवाडी, पुणे-११ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
भोसरी विभाग, टेल्को रोड, भोसरी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
उप कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
भोसरी विभाग, टेल्को रोड, भोसरी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६०६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि. १७.१२.२००८ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
भोसरी विभाग, टेल्को रोड, भोसरी, पुणे श्री. आर.एल.सोनुले

**जन माहिती अधिकारी** तथा
उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.,
भोसरी विभाग, टेल्को रोड, भोसरी, पुणे श्री. जी.एस.लोखंडे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २८.८.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २९.९.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ३०.१२.२००६ |

८ माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १२.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.१७.१२.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री. प्रकाश सोमण यांनी केलेल्या अर्जावर कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, पुणे शहर यांनी दिलेल्या दोन मुद्दयांच्या माहितीत तफावत असल्याच्या कारणावरुन अपीलकर्ता श्री. शेखर अरविंद कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री. सोमण यांनी केलेल्या अर्जावर परिपूर्ण माहिती मुदतीत देण्यात आली आहे. मूळ अर्ज श्री. कुलकर्णी यांनी केलेला नाही. त्यांनी स्वतः माहिती न मागता अपील करणे चुकीचे ठरवून अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भोसरी यांनी त्यांचे अपील फेटाळले. म्हणून श्री. कुलकर्णी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे. श्री. कुलकर्णी यांनी केलेल्या अर्जांनुसार स्वतंत्रपणे माहिती देण्यात आली असून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेले अपील त्यांच्या अर्जावरील नाही, असे लेखी व तोंडी प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, भोसरी श्री. आर.एल.सोनुले यांनी केले. स्वतः केलेल्या अर्जांव्यतिरिक्त अन्य व्यक्तीच्या अर्जाच्या उत्तरावर अपील करण्याची श्री. कुलकर्णी यांची कृती अयोग्य, तसेच सर्व यंत्रणांच्या वेळेचा व परिश्रमाचा अपव्यय करणारी आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अवये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवासमोर, पुणे १

श्री. शंकर रामचंद्र माळवदे
४४३, कमला चेंबर्स, सदर बाजार, सातारा **अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी
सातारा नगर परिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल (आस्थापना विभाग)
लेखापरीक्षक (अभिलेख विभाग)
सातारा नगर परिषद, सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६२२ / सातारा |
| २ | सनावणीची तारीख | २५.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी
सातारा नगर परिषद, सातारा श्री. सतीश कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा लेखापाल (आस्थापना विभाग)
लेखापरीक्षक (अभिलेख विभाग)
सातारा नगर परिषद, सातारा
श्री. हेमंत एच. जाधव व श्री. अरूण स. शिंदे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ८.१०.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ११.११.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १५.११.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.१२.२००८ |
| ८ | माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि. १६.४.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि. २५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अपीलकर्ता श्री. शंकर रामचंद्र माळवदे यांनी शुल्क भरल्यानंतर दुसऱ्याच दिवशी माहिती देण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी तथा लेखापाल, सातारा नगर परिषद श्री. हेमंत एच. जाधव यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

श्री. माळवदे यांना अर्ज मिळाल्यापासून २३ व्या दिवशी शुल्क कळविले. त्यानंतर आठ दिवसांनी त्यांनी शुल्क भरले. हा कालावधी विलंबाचा म्हणून ते गृहीत धरत आहेत, असे अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगर परिषद, सातारा श्री. सतीश कुलकर्णी यांनी नमूद केले. उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता अपीलकर्त्यास विहित मुदतीत माहिती देण्यात आली आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि. २१.११.२००९

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

श्री.प्रभाकर पांडुरंग माधव
शिवमाला, मणेश कॉलनी,
गोळीबार मैदान, कसबा बावडा, कोल्हापूर
अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर
उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी तथा** उप शहर अभियंता,
वि. का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १. | अपील क्रमांक | ६३० / कोल्हापूर |
| २. | सुनावणीची तारीख | दिनांक : २७.१०.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.प्रभाकर पांडुरंग माधव
शिवमाला, मणेश कॉलनी, गोळीबार मैदान, कसबा बावडा, कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप आयुक्त,
कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** उप शहर अभियंता,
वि. का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | १९.१२.२००८ |
| ५. | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | १६.१.२००९ व १०.३.२००९ |
| ६. | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | ३०.१.२००९ |
| ७. | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | २५.२.२००९ |

८. **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे.

## विवेचन

बांधकाम नकाशाला महानगरपालिकेत अयोग्य पध्दतीने मंजुरी दिल्याच्या परिणामी विजेचा झटका बसून एक व्यक्ती मृत्यू पावली.याबाबत मागितलेल्या ४० मुद्दयांपैकी फक्त सात मुद्दयांची माहिती दिली व ३३ मुद्दयांची माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.प्रभाकर पांडुरंग माधव यांनी केले. माहिती न मिळालेल्या ३३ मुद्दयांचा तपशील त्यांनी सादर केला.

संबंधित बांधकामाबाबत चुकीचा नकाशा मंजूर केला आहे. वाढीव मजल्याच्या बांधकामाला परवानगी देताना वीज वाहिन्यांच्या संदर्भातील अंतर आदी नियमांचे पालन केले गेलेले नाही. तसेच मयतांच्या वारसांबाबत महानगरपालिकेची स्पष्ट भूमिका काय असणार आहे, हे सांगितले जात नाही, अशा स्वरूपाचे आक्षेप श्री.माधव यांनी नोंदविले.

विषयांकित बांधकामासंबंधीची संपूर्ण मूळ नस्ती श्री.जाधव यांना दाखविली. त्यात असलेली सर्व माहिती त्यांना देण्यात आली आहे. वाढीव मजल्याच्या परवानगीबाबतच्या माहितीचाही त्यात समावेश आहे. अनेक बाबींचे स्पष्टीकरण, कायदेशीर-बेकायदेशीरपणा बद्दलचे मत अशा स्वरूपाची विचारणा श्री.माधव यांनी अनेक मुद्दयांमध्ये केली आहे. महानगरपालिका व वीज मंडळ यांच्यावर पोलिसांनी फौजदारी गुन्हा नोंदवावा अशी मागणी करूनही पोलीस कारवाई करीत नाहीत, असे मुद्दे श्री.माधव यांनी मांडले आहेत. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत अशा स्वरूपाची विचारणा करता येत नसून या मुद्दयांचे उत्तर दिलेले नाही, असे जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, वि.का.क्र.२, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.शंकर कृष्णा माने व अपिलीय प्राधिकारी तथा उपायुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर श्री.गणेश देशमुख यांनी नमूद केले.

श्री.माधव यांच्या अर्जातील अनेक मुद्दे भाष्य करणारे, गृहितांवर आधारित विचारणा करणारे अथवा स्पष्टीकरण मागणारे आहेत, हे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांचे प्रतिपादन रास्त आहे. मात्र एका व्यक्तीचा मृत्यू झाल्याच्या अपघाताच्या अनुषंगाने बांधकामविषयक नियमांचे पालन झाले की नाही, याबाबतची माहिती स्पष्टपणे दिली गेली पाहिजे. आयुक्त, महानगरपालिका, कोल्हापूर यांनी या अनुषंगाने प्रत्यक्ष पाहणी व चौकशी करून आठ दिवसांत आयोगाला अहवाल सादर करावा, असे मौखिक आदेश

आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. आयुक्त, महानगरपालिका, कोल्हापूर यांच्याकडून अद्याप असा अहवाल आयोगाला प्राप्त झालेला नाही, ही बाब गंभीर आहे.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशतः मान्य.

(२) आयोगाने सुनावणीच्या वेळी दिलेल्या मौखिक आदेशानुसार केलेल्या कार्यवाहीचा अहवाल विलंबाच्या कारणांच्या स्पष्टीकरणासह आयुक्त, महानगरपालिका, कोल्हापूर यांनी दि.१०.१२.२००९ पर्यंत सादर करावा.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

श्री.मोहन सुरेश प्रभुणे
५०१, मंगळवार पेठ, प्लॉट नं.२४,
विद्यार्थी, चिपळूणकर बाग कॉलनी,
सातारा

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी** तथा
१) नगर अभियंता (बांधकाम विभाग)
२) नगर रचनाकार (शहर विभाग)
३) आरोग्य निरीक्षक (आरोग्य विभाग)

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३३ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.०६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता -**

**अपिलीय प्राधिकारी** तथा मुख्याधिकारी,
सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी

**जन माहिती अधिकारी** तथा
१) नगर अभियंता (बांधकाम विभाग) श्री.श्रीराम नागरे
२) नगर रचनाकार (शहर विभाग) श्री. प्रशांत राजे
३)आरोग्य निरीक्षक (आरोग्य विभाग) श्री.शिवदास साखरे

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.०५.०८.२००८ |
| ५ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि.३०.०८.२००८,<br>दि.०१.०९.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. |
| ७ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि.०५.१२.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br>माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र -अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.मोहन सुरेश प्रभुणे यांनी १५ मुद्यांची माहिती मागितली होती. न्यायालयाकडील कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध करुन देण्यासह सर्व माहिती देण्यात आली आहे. काही मुद्यांमध्ये (उदा.मुद्दा क्र.१५) त्यांनी खुलासे वजा विचारणा केली आहे. त्याबाबत अभिलेख अवलोकनास उपलब्ध असल्याबाबतचे त्यांना कळविले आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा (१) नगर अभियंता (बांधकाम विभाग) (२) नगर रचनाकार (शहर विभाग) (३)आरोग्य निरीक्षक (आरोग्य विभाग) सातारा नगरपरिषद, सातारा व अपिलीय प्राधिकारी तथा मुख्याधिकारी, सातारा नगरपरिषद, सातारा श्री.सतीश कुलकर्णी यांनी केले.

अपीलकर्त्याने काही बाबी प्रश्नार्थक विचारल्या असल्या तरी अभिलेखानुसार त्याचे उत्तर द्यावे, तसेच अपीलकर्त्यास अभिलेख अवलोकनार्थासाठी उपलब्ध करुन द्यावे, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दिनांक : ३० /११ /२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. तानाजी आनंदा पाटील
मु. पो. कडाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर — अपीलकर्ता

विरूध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध),
कोल्हापूर, ताराराणी पार्क, कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री चाळोबा सहकारी दुग्ध
व्यवसाय संस्था मर्यादित, कडाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३६ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.१९.११.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री. तानाजी आनंदा पाटील
मु. पो. कडाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था(दुग्ध),
कोल्हापूर, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.मोहन चांगदेव निंबाळकर

**जन माहिती अधिकारी** तथा सचिव, श्री चाळोबा सहकारी दुग्ध
व्यवसाय संस्था मर्यादित, कडाळ, ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर
प्रतिनिधी ॲड.एस.आर.चनवीर

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.१२.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २७.२.२००९ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर असल्याने दि.१९.११.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

श्री चाळोबा सहकारी दूधसंस्था मर्यादित, कडाल, ता.गडहिंग्लज यांच्या संदर्भातील आपण मागितलेली माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध),कोल्हापूर, ताराराणी पार्क, कोल्हापूर यांनी देऊनही माहिती मिळालेली नाही, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.तानाजी आनंदा पाटील यांनी केली. संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नसल्याचे संस्थेच्या सचिवांनी आपल्याला कळविले. परंतु ही संस्था नोंदणीकृत आहे, संस्थेने बांधलेली इमारत जिल्हाधिकारी अगर विभागीय आयुक्त यांची परवानगी न घेता ग्रामपंचायतीचा खोटा दाखला घेऊन सरकारी मालकीच्या जमिनीवर बांधलेली आहे. बँक ऑफ इंडियातील व कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक यांच्याकडून शासकीय अनुदान तत्त्वावर दूध उत्पादक संस्थांना म्हशी घेऊन दिल्या आहेत. त्यामुळे संस्थेला अप्रत्यक्षरित्या शासकीय अनुदान मिळाले, म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ त्यांना लागू होतो, असे प्रतिपादनही श्री.तानाजी आनंदा पाटील यांनी केले.

श्री.पाटील हे गावचे पोलीस पाटील होते. गैरवर्तनामुळे त्यांना निलंबित करण्यात आले आहे. ते संस्थेचे सभासद असून यापूर्वी वेळोवेळी त्यांनी मागितलेली माहिती दिली आहे. सन २००८ पूर्वी ते संस्थेचे सभासद होते. मात्र सातत्याने संस्थेला नाहक त्रास देऊन ते संस्थेची बदनामी

करीत असल्याच्या कारणावरून संस्थेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत बहुमताने त्यांचे सभासदत्त्व रद्द करण्यात आले आहे. संस्थेला कोणतेही शासकीय अनुदान मिळत नाही. स्वभांडवलावर संस्था चालते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ संस्थेला लागू होत नाही, असे प्रतिपादन संस्थेचे प्रतिनिधी ॲड.एस.आर.चनवीर यांनी केले.

श्री.पाटील यांनी यापूर्वीही असे अर्ज व अपिले केली आहेत. कोल्हापूर जिल्ह्यातील नऊ दूध संस्थांना शासकीय अनुदान मिळते. चाळोबा संस्थेसह इतर संस्थांना शासनाची सवलत व अनुदान नाही, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था(दुग्ध),कोल्हापूर, ताराराणी पार्क, कोल्हापूर श्री.मोहन चांगदेव निंबाळकर यांनी केले.

माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ अन्वये संस्था सार्वजनिक प्राधिकरण ठरत असल्याचे पुरावे अपीलकर्ता श्री.पाटील देऊ शकले नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.महेश शिवदास वाघमोडे
१०९, गजानन नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापूर — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त,
राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, सोलापूर, जि.सोलापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, सोलापूर, जि.सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६३७ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२८.१.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.महेश शिवदास वाघमोडे
१०९, गजानन नगर, होटगी रोड, मजरेवाडी, सोलापूर

**जन माहिती अधिकारी** तथा वैद्यकीय अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, सोलापूर, जि.सोलापूर डॉ.संजय गायकवाड

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २१.६.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १९.७.२००७ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. १३.८.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २५.१०.२००७ |
| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.८.१०.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२८.१.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

कै.शिवदास वाघमोडे यांच्या निधनानंतर त्याच्या कुटुंबियांचे योग्य व न्याय्य हक्क डावलले जात आहेत. दिलेली पदोन्नती काढून घेणे, पदोन्नतीवर असताना मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्याच्या कुटुंबियांना द्यावयाच्या उपदानाच्या रकमेबाबत नियमानुसार कार्यवाही न करणे आदि बाबींनी कै.शिवदास वाघमोडे यांच्या कुटुंबियांची जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधिकारी, राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, सोलापूर, जि.सोलापूर व अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, राज्य कामगार विमा योजना कार्यालय, मुंबई यांनी आर्थिक व मानसिक हानी केली आहे व दिलेली माहिती चुकीची आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.महेश शिवदास वाघमोडे यांनी केले.

अपीलकर्ता श्री.वाघमोडे यांनी मागितलेली माहिती विहित मुदतीत व नियमानुसार केलेल्या कार्यवाहीनसुार देण्यात आली. कै.वाघमोडे यांना तात्पुरती पदोन्नती देण्यात आली होती. तशा स्वरूपाचे प्रकरण असल्यामुळे विशिष्ट नियमाची माहिती देणे शक्य नव्हते. श्री.वाघमोडे यांनी अशा संदर्भात सहा महिन्यात आठ अर्ज केले असून त्या त्या वेळी त्यांना संपूर्ण माहिती देण्यात आली आहे, असे लेखी निवेदन जन माहिती अधिकारी तथा राज्य कामगार विमा योजना रूग्णालय, सोलापूर, जि.सोलापूर डॉ.संजय आत्माराम गायकवाड यांनी केले. कै.वाघमोडे यांच्या कुटुंबियांना द्यावयाचे सेवानिवृत्तीवेतन लाभ आदिबाबत केलेल्या कार्यवाहीची तपशीलवार माहिती त्यांनी पूरक कागदपत्रांसह लेखी निवेदनारद्वारे सादर केली. अपीलकर्ता श्री.वाघमोडे यांना माहिती

देण्यात आली असून त्यांचा आक्षेप कार्यवाहीबाबतचा आहे. ही बाब माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

पुणे
दि.३०.११.२००९

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.सॅम एच दलाल
कॅमिले अपार्टमेंट, लेन बी, ३७२/ए/२,
नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क, पुणे — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-जिल्हा निबंधक, वर्ग-१,
पुष्पमंगल कार्यालय इमारत, दुसरा मजला,
बिबवेवाडी कॉर्नर बिबवेवाडी, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सह-दुय्यम निबंधक, हवेली क्र.२,
पुष्पमंगल कार्यालय इमारत, दुसरा मजला,
बिबवेवाडी कॉर्नर बिबवेवाडी, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४० / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२७.११.२००८ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.सॅम एच दलाल
कॅमिले अपार्टमेंट, लेन बी, ३७२/ए/२, नॉर्थ मेन रोड, कोरेगाव पार्क, पुणे
**अपिलीय प्राधिकारी** तथा सह-जिल्हा निबंधक, वर्ग-१, पुष्पमंगल कार्यालय इमारत, दुसरा मजला, बिबवेवाडी कॉर्नर बिबवेवाडी, पुणेश्री.सी.बी.भुरकुंडे
**जन माहिती अधिकारी** तथा सह-दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, पुष्पमंगल कार्यालय इमारत, दुसरा मजला, बिबवेवाडी कॉर्नर बिबवेवाडी, पुणे श्री.अ.वि.चटलावार

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ९.७.२००६ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ७.१०.२००६ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २७.१०.२००६ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |

| ८ | माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. |
|---|---|

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२७.११.२००८ रोजी सुनावणी घेण्यात आली.

नोंदणीसाठी आपण सादर केलेल्या कागदपत्रानुसार नोंदणी झाली नाही व मूळ दस्त पूर्ण करून आपल्याला मिळाले नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री.सॅम एच.दलाल यांनी केली. कार्यालयाचे स्थलांतर व दस्त नोंदणीतील तांत्रिक अडचणी यामुळे संबंधित दस्त सापडत नव्हते. अर्धवट दस्त मे महिन्यात सापडला. इंडेक्सवरून दस्त करून देता येईल, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे श्री.अ.वि.चटलावार यांनी केले.

अपीलकर्त्याच्या मूळ दस्ताबाबतच्या मागणीबाबत आवश्यक ती कार्यवाही पूर्ण करून दि.२१.२.२००८ पर्यंत अपीलकर्त्यास पोहोच करावा, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले. त्यानुसार दि.२.१२.२००८ रोजी श्री.दलाल यांना मूळ दस्त पूर्ण करून देण्यात आल्याचे, त्यांची पोहोच दर्शविणाऱ्या स्वाक्षरीच्या प्रतीसह जन माहिती अधिकारी तथा सह दुय्यम निबंधक, हवेली क्र.२, बिबवेवाडी, पुणे श्री.अ.वि.चटलावार यांनी दि.३०.११.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.अशोक तुकाराम निकम
मु.पो.अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प,
अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६४५ / सातारा |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२५.६.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.अशोक तुकाराम निकम
मु.पो.अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा

**अपिलीय प्राधिकारी** तथा गटविकास अधिकारी,
पंचायत समिती कोरेगाव, ता.कोरेगाव, जि.सातारा प्रतिनिधी श्री.सी.एन.घारे

**जन माहिती अधिकारी** तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प,
अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.माधव भगवंता निकम

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. ४.१२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. ५.३.२००९ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ५.२.२००९ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ५.३.२००९ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.५.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२५.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

अंभेरी, ता.कोरेगाव, जिल्हा सातारा येथे जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत चालू असलेल्या कामामधील काही बाबी गैर वाटल्यामुळे आपण माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प, अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा यांनी माहिती दिली नाही. पूर्ण माहिती देण्याचा आदेश अपिलीय प्राधिकाऱ्यांनी देऊनही माहिती मिळाली नाही. आयोगाने आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी काही माहिती दिली, हे लक्षात घेता जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प, अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा यांच्यावर दंडात्मक कारवाई व्हावी अशी मागणी अपीलकर्ता श्री.अशोक तुकाराम निकम यांनी केली.

श्री.निकम यांना संपूर्ण माहिती देण्यास आपण गेलो असता त्यांनी ती स्वीकारली नाही, संबंधित खात्याकडे देण्यास त्यांना सांगितले. 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'च्या वेळी कागदपत्रे तपासून त्यांनी माहिती घेतली. मूळ अर्जात नसलेल्या बाबींचा उल्लेख करून माहिती अपुरी असल्याचे ते म्हणत आहेत. श्री.निकम यांनी दारिद्र्यरेषेखालील दाखला दिला असल्यामुळे ७४५ पानांची माहिती नि:शुल्क दिली आहे. १० टक्के लोकवर्गणी व ९० टक्के शासकीय अनुदान अशा

पध्दतीने ही कामे केली जातात. सामाजिक कामाचा भाग म्हणून आपण हे करीत असताना अडचणी निर्माण केल्या जातात व अडचणींमधून काम पूर्ण केल्यानंतर अशा प्रकारे त्रास दिला जातो. छायांकित प्रतीचा खर्च आपण स्वत: केला आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष, जलस्वराज्य प्रकल्प, अंभेरी, ता.कोरेगाव, जि.सातारा श्री.माधव भगवंता निकम यांनी केले.

जन माहिती अधिकारी श्री.निकम यांचे निवेदन लक्षात घेता अपीलकर्त्याने मूळ अर्जात मागितलेली माहिती देण्यात आलेली आहे. त्या व्यतिरिक्तची माहिती न मिळाल्याची तक्रार ग्राह्य मानता येणार नाही. अपीलकर्ता दारिद्र्यरेषेखालील असल्यामुळे व कामाच्या निधीमधून छायांकित प्रती घेण्यासाठी खर्च करणे शक्य असल्यास अपीलकर्त्याने अभिलेखाचे अवलोकन करून मोजक्या प्रती घेणे आवश्यक आहे, अन्यथा त्यानी स्वखर्चाने छायांकित प्रती करून घ्याव्या.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२५.११.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**<u>माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.</u>**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.लक्ष्मण चंदूलाल हेबारे
चंद्रहास किल्लाभाग, मिरज, ता.मिरज, जि.सांगली — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव (आस्थापना),
मंत्रालय, मुंबई-३२

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५२ / सांगली |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.९.२००९ |

**३. उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उपसचिव (आस्थापना),
मंत्रालय, मुंबई-३२ श्री.सी.डी.देशमुख

**जन माहिती अधिकारी** तथा अवर सचिव,
सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई-३२ श्री.भि.य.मंता

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १६.२.२००८ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.३.२००८ |

| | | |
|---|---|---|
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २१.४.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. २२.५.२००८ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>माहिती-मागणीच्या अर्जाची (जोडपत्र अ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.११.११.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांमध्ये एकमत न झाल्याने दि.२३.६.२००९ रोजी सुनावणी घेण्यात आली.

आपण अनुरेखक संवर्गातील वेतनश्रेणीसंबंधीची माहिती जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्याकडे मागितली होती. वित्त विभागाने सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्याकडून संबंधित संचिकेची जबाबदारी परस्परांवर ढकलण्यात येत असल्यामुळे माहिती दिलेली नाही, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री.लक्ष्मण चंदूलाल हेबारे यांनी केले.

श्री.हेबारे यांचा विषय वेतननिश्चितीचा आहे. संबंधित संचिका सन १९९९ मध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाकडून निर्णयासाठी वित्त विभागाकडे पाठविण्यात आली होती. परंतु संबंधित नस्ती वित्त विभागाकडून परत आली नाही. याबाबत वित्त विभागाशी पत्रव्यवहार करण्यात आला. तसेच कसून शोध घेण्यात येऊनही संचिका उपलब्ध होऊ शकत नाही. मात्र संबंधितांची वेतननिश्चिती झ ालेली आहे, असे निवेदन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.भि.य.मंता व अपिलीय प्राधिकारी तथा उपसचिव(आस्थापना), सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई श्री.बी.डी.देशमुख यांनी केले. तसेच संबंधित संचिकेचा शोध घेण्याबाबत केलेल्या प्रयत्नाचा तपशील लेखी निवेदनाद्वारे त्यांनी सादर केला. मुख्य सचिवांच्या निदेशानुसार पाच वर्षांपूर्वीचे जुने अभिलेख नष्ट करण्याच्या मोहिमेस अनुसरून सन १९९९ मधील

नोंदणी शाखेतील सर्व अभिलेख नष्ट करण्यात आल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागातील नोंदणी शाखेने स्पष्ट केले असल्याचेही श्री.देशमुख यांनी निवेदनात म्हटले आहे. वरील बाबी लक्षात घेता अभिलेखाच्या उपलब्धतेबाबत निश्चिती होत नसून संबंधितांची वेतननिश्चिती झाली आहे, असे दिसते.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे:

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३०.११.२००९**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधानभवनसमोर, पुणे ४११ ००१

डॉ.रामचंद्र बळवंत मगदूम — अपीलकर्ता
चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.), — उत्तरवादी
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६५७ / कोल्हापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दिनांक २७.१०.२००९ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** डॉ.रामचंद्र बळवंत मगदूम
चिखली, ता. कागल, जि.कोल्हापूर

**अपिलीय प्राधिकारी तथा** उप मुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रा.प.),
कोल्हापूर जिल्हा परिषद, जि.कोल्हापूर

**जन माहिती अधिकारी तथा** गट विकास अधिकारी (वर्ग-१),
पंचायत समिती, कागल, ता. कागल, जि.कोल्हापूर

| | | | |
|---|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दिनांक | २६.१२.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दिनांक | २४.१.२००८ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दिनांक | १८.२.२००८ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दिनांक | ७.४.२००८ |

८ **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :-**

ग्रामपंचायत चिखली, ता.कागल च्या दि.२८.११.२००६ च्या ग्रामसभेत सार्वजनिक बाबींवरील खर्च रु.२३९२१/- नामंजूर केल्या संदर्भातील चौकशी अहवालाच्या अनुषंगाने ग्रामसेवक श्री. बी. ए. किल्लेदार यांच्या विरुध्दच्या शिस्तभंगाच्या कारवाईची माहिती.

## विवेचन

राज्य माहिती आयोगाने दि.२९.५.२००९ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी अपीलकर्ता गैरहजर राहिल्यामुळे अपिलाची सुनावणी दि.२७.१०.२००९ रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या दिवशीही अपीलकर्ता गैरहजर होते.

श्री.बी.ए.किल्लेदार, माजी ग्रामविकास अधिकारी, चिखली यांच्याकडून रक्कम वसूल करण्याच्या आदेशाच्या कार्यवाहीची माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता डॉ.रामचंद्र बळवंत मगदूम यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

डॉ.मगदूम याच विषयाबाबत यापूर्वी विविध पातळ्यांवर अनेक अर्ज केले असून त्या त्या वेळी त्यांना माहिती देण्यात आली आहे. आयोगाने यापूर्वी याच विषयाबाबत अपील क्र.४५२ व ३९२ ही निकाली काढली आहेत. संबंधित ग्रामविकास अधिकाऱ्याविरूध्द रक्कम वसुलीबाबत कारवाई करण्यात आली असून श्री.किल्लेदार यांच्या निवृत्तीवेतनातून दहा समान हप्त्यांमध्ये रूपये २३९२१/- वसूल करून ग्रामनिधीत जमा करण्याचा आदेश दि.११.५.२००९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर यांनी दिला होता. त्यानुसार दोन हप्त्यांची रक्कम वसूल करण्यात आली असून संबंधिताविरूध्द शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित आहे, असे जन माहिती अधिकारी सौ.रश्मी आर.कुलकर्णी व अपिलीय प्राधिकारी श्री.मधुकर चौगुले यांनी संबंधित कागदपत्रांसह नमूद केले. त्यातील तपशील पाहता अपीलकर्त्याच्या मागणीनुसार मूळ प्रकरणी

कारवाई करण्यात आली असून माहिती देण्यात आली आहे, असे असताना पुन्हा अपील करून सर्व यंत्रणांचा वेळ व शक्ती त्या कारणी लावण्याची अपीलकर्त्याची कृती योग्य नाही.

उभय बाजूंनी सादर केलेली निवेदने व कागदपत्रे पाहता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१६.११.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्या समोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
विधानभवन समोर, पुणे - ४११ ००१

श्री. जयप्रकाश बाबय्या सानेपागोलू
७७४, उत्तर सदर बझार, सोलापूर

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका, शिक्षण मंडळ, सोलापूर

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
बापूजी प्राथमिक शाळा, उत्तर सदर बझार,
गुरूवस्ती, सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६ / २००९ / सोलापूर |
| २ | सुनावणीची तारीख | दि. २९.१०.२००९ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. जयप्रकाश बाबय्या सानेपागोलू
७७४, उत्तर सदर बझार, सोलापूर

**अपिलीय प्राधिकारी** तथा प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका, शिक्षण मंडळ, सोलापूर श्री. एम.के.भोसले

**जन माहिती अधिकारी** तथा मुख्याध्यापिका,
बापूजी प्राथमिक शाळा, उत्तर सदर बझार, गुरूवस्ती, सोलापूर
श्रीमती कमल अशोक जगताप

| | | |
|---|---|---|
| ३ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १.१२.२००८ |
| ४ | जन माहिती अधिकाऱ्याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २९.१२.२००८ |
| ५ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २३.१.२००९ |
| ६ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. -- |
| ८ | माहिती - मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र-अ ) प्रत सोबत जोडली आहे. | |

## विवेचन

आपण मागितलेल्या माहितीतील सहापैकी पाच मुद्दयांची माहिती विहित मुदतीत दिली नाही. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दिलेल्या आदेशानंतर जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बापूजी प्राथमिक शाळा, उत्तर सदर बझार, सोलापूर यांनी माहिती दिली. लिपिका श्रीमती पी.ए. हलकुडे यांची नेमणूक अयोग्य पध्दतीने झाली असून वैद्यकीय प्रमाणपत्राशिवाय त्यांची नेमणूक केली असून त्याबाबतची कागदपत्रे सत्य माहितीवर आधारित दिली जात नाहीत, अशी तक्रार अपीलकर्ता श्री. जयप्रकाश बाबय्या सानेपागोलू यांनी केले.

श्री. सानेपागेलू यांनी एका मुद्यात पंधरा उप मुद्यांची माहिती मागितली आहे. इतर सर्व मुद्दे श्रीमती हलकुडे यांच्या नेमणुकीबाबतच्या आक्षेपाचे आहेत व त्या अनुषंगाने माहिती मागितली आहे. दोन-तीन वेळा त्यांना माहिती दिली असून त्याची पोहच दप्तरी आहे. श्रीमती हलकुडे पूर्वी अन्य शाळेत कामाला होत्या. ती शाळा बंद झाली. अतिरिक्त म्हणून त्या आपल्या शाळेत असून वैद्यकीय प्रमाणपत्र त्यांनी मूळ शाळेत दिले होते, आपल्या शाळेकडे दिले नाही. परंतु प्रमाणपत्राच्या प्रती त्यांच्याकडे मागितल्या आहेत, असे जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका श्रीमती कमल अशोक जगताप यांनी पूरक कागदपत्रांसह नमूद केले.

जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, बापूजी प्राथमिक शाळा यांनी माहिती अनेकदा व विहित मुदतीत दिली आहे. शाळेत नसलेली माहिती मिळवून देण्याचा त्यांनी प्रयत्न केला आहे. ही माहिती लवकरात लवकर प्राप्त करून अपीलकर्त्यास द्यावी. मात्र कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीच्या कायदेशीरपणाबाबतचे आक्षेप व त्याबद्दलचे स्पष्टीकरण हा माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अंतर्गत 'माहिती' म्हणून विचारात घेता येणारी बाब नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील अमान्य करण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १७.११.२००९

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी,
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ७, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६३ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच आवश्यक शुल्क (रु. २०/- चे वैध मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.३० -११-२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी,
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**अपीलकर्ता**

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, कोल्हापूर

**उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी,** कार्यकारी अभियंता,
राष्ट्रीय महामार्ग विभाग क्र. ७, कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६४ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत अपीलासोबत जोडलेली नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच आवश्यक शुल्क (रु. २०/- चे वैध मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.२७-११-२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. संपत पांडुरंग आबदार
'अवधूत', जयभवानी कॉलनी, **अपीलकर्ता**
रिंगरोड, फुलेवाडी, कोल्हापूर

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** मख्य अभियंता, **उत्तरवादी**
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे

**जन माहिती अधिकारी तथा** सहायक मुख्य अभियंता,
सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ६६५ / कोल्हापूर |
| २ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - अपीलकर्त्याने माहिती-मागणीच्या मूळ अर्जाची (जोडपत्र - अ) छायाप्रत अपिलासोबत जोडलेली नसल्याने मूळ माहितीचा बोध होत नाही. | |

**विवेचन**

अपीलकर्ता श्री. संपत पांडुरंग आबदार यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब, तसेच जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर व अपिलीय प्राधिकारी यांचा निर्णय इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नसल्याने तसेच आवश्यक शुल्क (रु. २०/- चे वैध मुद्रांक अथवा पोस्टल ऑर्डर) जोडलेली नसल्याने त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलावर कार्यवाही करण्यात येणार नाही.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ३० -११-२००९**